# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः11.07.2025 वारःशुक्रवार

---

- महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर.

- गणेशोत्सव हा सण राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्याची सरकारची ग्वाही.

- राज्यातील कटकमंडळे स्थानिक स्वराज्य संस्थेत समाविष्ट होणार. आणि

- अँडरसन-तेंडुलकर क्रिकेट मालिकेच्या तिसऱ्या कसोटीत इंग्लंडची सावध सुरुवात.

**इंट्रो-विधानसभा,विधानपरिषद**

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात काल विशेष जन सुरक्षा विधेयकाच्या मंजुरीसह विविध विषयांवर चर्चा तर काही विषयांवर निर्णय घेण्यात आले. ऐकूया अधिक वृत्तांत माझे सहकारी प्रशांत जाधव यांच्याकडून...

स्क्रिप्ट : महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विधानसभेत काल मंजूर करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक सादर केलं. देशाच्या व्यवस्थेवर घाला घालणाऱ्या विरोधात कडक कायदे करण्याची गरज व्यक्त करत, असा कायदा करण्यामागची भूमिका मुख्यमंत्र्यांनी सदनात स्पष्ट केली. याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले. . . . . . .

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मात्र विरोधकांचा आवाज दाबणे, घटनेने दिलेले  अधिकार हिरावून घेणे आणि स्वतःचा राजकीय विरोध संपवणे हा विधेयकाचा उद्देश असल्याची टीका आमदार भास्कर जाधव यांनी केली आहे.

राज्याला गणेशोत्सवाची शंभर वर्षांची परंपरा असून हा सण राज्य महोत्सव म्हणून हे सरकार घोषित करेल, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली आहे. याबाबत अधिक माहिती देताना आशिष शेलार म्हणाले.

**<u>बाईट – आशिष शेलार</u>**

मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कुठल्याही पात्र गिरणी कामगाराला घरापासून वंचित ठेवले जाणार नाही तसच मुंबई शहर आणि लगतच्या परिसरात जिथे जागा उपलब्ध असेल, अशा ठिकाणी गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात येईल असा निर्णय काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत झाल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने १८१ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता दिल्याची आणि वर्धा इथल्या सेवाग्राम रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या तक्रारीबाबत आढावा घेतला जाईल अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील वरवणे येथील आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

**<u>काम -विधानसभा,विधानपरिषद</u>**

राज्यातल्या १ कोटी ७५ लाख शेतमजुरांसाठी विमा योजना लागू करण्यात येईल अशी घोषणा कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत केली. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी एक समिती स्थापन करण्यात आली असल्याचं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितलं. शेतजमीन, बांध आणि रस्त्यांवरुन निर्माण होणाऱ्या वादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्यव्यापी शेतजमीन मोजणी मोहीम राबवणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत दिली.

जीआय तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी डिजिटलायझेशन केलं जाईल. पुढील दोन वर्षांत “आधी मोजणी, मग रजिस्ट्री” धोरण राबवलं जाईल, त्यामुळं जमिनीचे वाद कायमचे संपुष्टात येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विधानपरिषदेत मुंबईतल्या नवीन इमारतींमध्ये, मराठी माणसांसाठी घरांचं ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबतचं धोरण निश्चित केलं जाईल, असं आश्वासन शंभूराज देसाई यांनी दिलं. एखाद्या ठिकाणी मराठी माणसाला घर नाकारलं जात असेल तर त्या बांधकाम व्यावसायिकावर निश्चित कारवाई केली जाईल, असंही देसाई यांनी सांगितलं. आमदार मिलिंद नार्वेकर यांनी तारांकित प्रश्नांद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता.

**<u>युवाधोरण</u>**

विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने सुधारित युवा धोरणाची आखणी करावी. नव्या आव्हानांना सामोरं जाणाऱ्या युवकांच्या बदलत्या विचारसरणीचा समावेश युवा धोरणात केल्यास परिवर्तन शक्य आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

विधानभवनात राज्याच्या सुधारित युवा धोरणासाठी गठित समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री आणि समितीचे अध्यक्ष दत्तात्रय भरणे आदि यावेळी उपस्थित होते.

तर पुणे, खडकी कटकमंडळ पुणे महापालिकेमध्ये, औरंगाबाद कटकमंडळ छत्रपती संभाजीनगर महापालिकेमध्ये ; देवळाली आणि अहमदनगर कटकमंडळ स्वतंत्र नगरपालिकामध्ये ; कामठी कटकमंडळ येरखेडा नगरपंचायतमध्ये - समाविष्ट होणार आहेत. या कटकमंडळाचा महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थात समावेश झाल्याने नागरीसुविधा तसेच इतर विकास होण्यास मदत होणार आहे असल्याचे मुख्यमंत्री देंवेद्र फडणवीस यांनी या संदर्भात विधानभवनात घेतलेल्या बैठकीत काल सांगितलं.

**<u>वॉका-मराठी परीक्षा</u>**

**<u>इंट्रो</u>**

अमेरिका, कॅनडा आणि डेन्मार्कमध्ये इयत्ता पहिली ते आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पहिलीच मराठी भाषेची परीक्षा यावर्षी मे महिन्यात घेण्यात आली. परीक्षार्थी 103 पैकी 24 विद्यार्थ्यांना ए-वन श्रेणी मिळाली. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

बालभारतीच्या पुस्तकांचा अभ्यास करुन या विद्यार्थ्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका यांच्याद्वारे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या अंतर्गत ही परीक्षा दिली. त्यामध्ये अमेरिकेतील 67, कॅनडातील 22, डेन्मार्कमधील 14 विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यापैकी 53 मुलं तर 50 मुली होत्या. या विद्यार्थ्यांना विविध श्रेणी देण्यात आल्या. पहिल्या परिक्षेला विद्यार्थी संख्या कमी होती, ती पुढील परिक्षेत वाढली पाहिजे अशी अपेक्षा मुक्त विद्यालय मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी व्यक्त केली. एकीकडे मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये तिसरी भाषा लागू करण्यावरुन चर्चा सुरु असताना परदेशात राहून मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचं हे मूल्यांकन अनिवासी भारतीय मराठी पालकांच्या मुलांसाठी नक्कीच लाभदायक ठरेल. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.

**<u>निर्यातमैत्री</u>**

अहिल्यानगर इथे काल निर्यात आणि मैत्री या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं . जिल्ह्यातील उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केलं जाईल असं जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी सांगितलं. अहिल्यानगर ॲटो अँड इंजिनिअरिंग क्लस्टर इथे आयोJIT या का जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास, अतिरिक्त कामगार आयुक्त आणि मैत्री सेलचे भास्कर मोराडे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते.

**<u>छळकारवाई</u>**

नाशिक जिल्हा परीषदेतील महिलांचा छळ करणाऱ्या एका विभाग प्रमुखासंदर्भात तीस महिलांनी निनावी तक्रार दाखल केल्यानंतर संबंधीताला चौकशी करून सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**<u>गुरुपौर्णिमा</u>**

गुरुपौर्णिमा राज्यात सर्वत्र काल मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विविध मंदिरांमध्ये भक्तांची दर्शनासाठी गर्दी झाली होती. शाळांमध्ये आपल्या गुरुजनांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं . रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण इथे कायदेविषयक जागरूकता शिबिर आयोजित करण्यात आलं होतं.

**<u>वृक्षप्रसाद</u>**

शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत “वृक्ष प्रसाद योजना” कालपासून औपचारिकपणे सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत इच्छुक साईभक्तांना प्रसादस्वरूप निंबवृक्षाची रोपे वितरित केली जात आहेत. सह्याद्री देवराई संस्थेद्वारे अभिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकरण्यात आला असून राज्यातील इतर मंदिरंदेखील यात सहभागी झाली आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात काल लॉर्ड्स इथे नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडचे सलामीवीर लवकर बाद झाल्यानं दिवसअखेर त्यांनी सावध खेळ करत 4 बाद 251 धावा केल्या होत्या. जो रूट 99 तर कर्णधार बेन स्टोक्स 39 धावांवर खेळत आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

**<u>पाऊस</u>**

चंद्रपूर जिल्ह्यात आठवडा भारतापासून पावसाची संततधार सुरु आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील धान आणि भाजीपाला पिकांना त्याचा फटका बसला आहे. जिल्ह्यातील बहुतांश नदी, नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

गडचिरोलीनजीकच्या पाल नदीच्या पुलावरुन पाणी वाहत असल्याने गडचिरोली-नागपूर मार्गावरील वाहतूक बंद आहे. गोविंदपूर नाल्याच्या पुरामुळे गडचिरोली-चामोर्शी आणि दिना नदीच्या पुरामुळे आष्टी-आलापल्ली मार्गांवरील वाहतूक ठप्प आहे. अन्य १२ मार्गांवरील वाहतुकही विस्कळीत झाली आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान अंदाज - मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल.

## **आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**